# राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान
# आशा कार्यक्रम
# जिल्हा परिषद सातारा

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत **"आशा स्वयंसेविका योजना"** आदिवासी व बिगर अदिवासी जिल्हयामध्ये राबविण्यात येत आहे. आरोग्य यंत्रणा, सेवाभावी संस्था व समाजातील अन्य महत्वपूर्ण घटक यामध्ये सुसंवाद व समन्वय निर्माण करण्याच्या दृष्टीने आशा स्वंयसेविका महत्वपूर्ण दुवा आहेत.

आरोग्य संवर्धन, विविध प्रतिबंधक व उपचारात्मक उपाय योजना तसेच समाजामध्ये जाणिव व जागृती वृध्दींगत करणे, यामध्ये आशा स्वयंसेविकेची महत्वाची भूमिका आहे. आरोग्य सेवा व आरोग्य संस्थांची माहिती सर्व घटकांपर्यत उपलब्ध करुन देणे, आरोग्य सेवा सुविधांचा लाभ घेणेसाठी लोकांना प्रोत्साहित करणे आरोग्याच्या बाबतीत लोकांमध्ये मानसिक व सामाजिक बदल घडवून आणणे इ. महत्वपूर्ण कामे आशा स्वयंसेविका करीत आहेत. माहे. सप्टें.२००८ पासून राज्यातील सर्व जिल्हयातील ही योजना कार्यान्वीत करण्यात येत आहे.

## १) आशा स्वयंसेविका निवडीसाठी अनुसरावयाची कार्यवाही :-

**आशा योजनेची संक्षिप्त माहिती**

- आशा गावची स्थानिक रहिवासी असेल
- आशाची निवड ग्रामसभा करेल
- ग्रामसभेने निवडलेल्या आशाची नियुक्ती तालुका आरोग्य अधिकारी करतील.
- आशाला नेमणुकीनंतर २३ दिवसाचे प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल.
- आशाने केलेल्या कामाच्या स्वरुपानुसार मोबदला दिला जाईल.

**प्रत्येक गावात निवडावयाच्या आशांची संख्या**

- गावात लोकसंख्येनुसार साधारणत १००० लोकसंख्येस १ या प्रमाणात आशा निवडण्यात येतील. त्यानुसार आशाची गाववार संख्या खालीलप्रमाणे असेल.

लोकसंख्या निकष :-

१) १५०० पर्यंत लोकसंख्या असल्यास १ आशा स्वयंसेविका
२) १५०० ते २५०० लोकसंख्या असल्यास २ आशा स्वयंसेविका
३) २५०१ ते ३५०० लोकसंख्या असल्यास ३ आशा स्वयंसेविका
४) त्यानंतर प्रत्येक १००० लोकसंखेसाठी १ जादा आशा स्वयंसेविका

## ३) आशा स्वयंसेविका निवडीसाठी आवश्यक अटी :-

- आशा स्वयंसेविका किमान १० वी पास व स्थानिक विवाहित महिला. उच्च शिक्षित महिलांना प्राधान्य.
- महिला गावची स्थानिक कायमची रहिवासी असावी. मोठया गावमध्ये १५०० लोकसंख्येपेक्षा जास्त लोकसंख्या असल्यास २ किंवा त्यापेक्षा जास्त आशा निवडताना गावाच्या त्या त्या भागातील स्थानिक महिला निवडावी.
- स्थानिक ,अदिवासी, विधवा,परितक्त्या महिलांना व स्वयंसेवी संस्थांच्या कार्यकर्तीना प्रामुख्याने प्राधान्य.
- आशाचे वय २५ ते ४५.

## आशा स्वयंसेविकेच्या भूमिका व जबाबदा-या :-

- आरोग्य संस्थेतील प्रसुती वाढविणे.
- मलेरिया,क्षयरोग,साथरोग,उपचारासाठी मदत करणे
- मोफत संदर्भ सेवेचा प्रचार करणे
- कुटुब कल्याण प्रचार, गर्भनिरोधकाचे वाटप करणे

- साध्या (किरकोळ) आजारावर उपचार उदा. ताप,खोकला,यावर औषधी मंचातील औषधाचा वापर करणे .
- माता व बाल आरोग्य विषयी प्रबोधन उदा. प्रसुतीपूर्व तपासणी, लसीकरण,स्तनपान,लोहयुक्त गोळया,आहार इत्यादी
- जन्म मृत्यु नोदणीमध्ये मदत करणे
- ग्राम आरोग्य पोषाहार दिनामध्ये मदत करणे

**आशा स्वंयसेविका पदाचे तालुका निहाय उददीष्ट**

| अ.न. | तालुक्याचे नाव | एकूण प्रा. आ.केंद्र | एकूण उपकेंद्रे | "आशा" मंजूर पदे | भरलेली पदे |
|---|---|---|---|---|---|
| १ | सातारा | ८ | ४५ | ३६६ | ३६६ |
| २ | जावली(मेढा) | ५ | २४ | १४६ | १४६ |
| ३ | महाबळेश्वर | ३ | १७ | ८४ | ८४ |
| ४ | वाई | ४ | २८ | १६६ | १६६ |
| ५ | खंडाळा | ३ | २० | १२२ | १२२ |
| ६ | फलटण | ६ | ३५ | २६६ | २६६ |
| ७ | माण | ५ | ३२ | १८३ | १८३ |
| ८ | खटाव | ७ | ४० | २८१ | २८१ |
| ९ | कोरेगांव | ६ | ३२ | २४७ | २४७ |
| १० | कराड | ११ | ६४ | ४५६ | ४५६ |
| ११ | पाटण | १३ | ६३ | ३३३ | ३३३ |
| | एकूण | ७१ | ४०० | २६५० | २६५० |

# आशा स्वयंसेविकेस अदा करण्यात येणारा मोबदला (आर्थिक वर्ष २०१०-११)

| क्र | आशा स्वयंसेविका योजनेचा सन २०१० – ११ या आर्थिक वर्षाचा मंजूर PIP | निधीची तरतूद | अदा करावयाचा मोबदला | मानधनाचे स्पष्टीकरण | आशा स्वयंसेविकेस मोबदला अदा करण्याची पध्दती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जननी सुरक्षा योजनेंतर्गत गरोदर मातांना संस्थात्मक प्रसुतिसाठी प्रवृत्त केल्यास (आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रासाठी) | आर.सी. एच. | आदिवासी जिल्हयांतील आदिवासी क्षेत्रासाठी रु.६००/- व<br>बिगर आदिवासी क्षेत्रासाठी रु. २००/- | गरोदर मातेला प्रसूतीसाठी शासकीय आरोग्य संस्था व मान्यताप्राप्त खाजगी संस्था येथे घेऊन येण्यासाठी आदिवासी क्षेत्रासाठी रु.६००/- व बिगर आदिवासी क्षेत्रासाठी रु. २००/- प्रोत्साहनपर रक्कम प्रति लाभार्थी | सदर रक्कम ज्या आरोग्य संस्थेत प्रसुती होईल त्या आरोग्य संस्थेतून जननी सुरक्षा योजनेच्या निधीतून मोबदला अदा करण्यात येईल. | **अतिरिक्त संचालक, कुटुंब कल्याण, माताबाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे यांचे १५ सप्टेंबर २०१० रोजीचे जननी सुरक्षा योजनें संदर्भातील निर्गमित** पत्रान्वये आदिवासी जिल्हयांतील आदिवासी क्षेत्रात आशा स्वयेंसविकेने लाभार्थीस संस्थात्मक प्रसुतीसाठी प्रवृत्त केल्यास रु.६००/- मोबदला अदा करण्यात यावा. |
| २ | स्त्री शस्त्रक्रियेस प्रवृत्त केल्यास | आर.सी. एच. | रु. १५०/- | प्रत्येक शस्त्रक्रिया साठी मोबदला अदा करण्यात येईल. | कुटूंब कल्याण निधीतून ज्या आरोग्य संस्थेत शस्त्रक्रिया झाली त्या आरोग्य संस्थेने मोबदला अदा करण्यात येईल. | |
| ३ | पुरुष शस्त्रक्रियेस प्रवृत्त केल्यास | आर.सी. एच. | रु. २००/- | प्रत्येक शस्त्रक्रिया साठी मोबदला अदा करण्यात येईल. | कुटूंब कल्याण निधीतून ज्या आरोग्य संस्थेत शस्त्रक्रिया झाली त्या आरोग्य संस्थेने मोबदला अदा करण्यात येईल. | |
| ४ | क्षयरोग्याला डॉटसचा उपचार पुर्ण झाल्यानंतर | आर.एन.टि. सी.पी | रु. २५०/- | प्रत्येक रुग्णाच्या उपचारासाठी | **राज्य क्षयरोग नियंत्रण सोसायटी, पुणे** यांचे जा.प्र.क्र.सहसंआसे/सुराक्षनिका/आशा/२१६३७-२१७१५/२०१० दिनांक २३.०७.२०१० रोजीच्या पत्रान्वये, तालुका आरोग्य अधिकाऱ्याकडील निधी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी यांनी प्राप्त करुन आशा स्वयंसेविकेस मोबदला अदा करण्यात येईल. | |

| क्र | आशा स्वयंसेविका योजनेचा सन २०१० – ११ या आर्थिक वर्षाचा मंजूर PIP | निधीची तरतूद | अदा करावयाचा मोबदला | मानधनाचे स्पष्टीकरण | आशा स्वयंसेविकेस मोबदला अदा करण्याची पध्दती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | हिवतापाचा समुळ उपचार | राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, | रु. ५/- | रुग्णाचा रक्तनमुना तपासणीसाठी **ANM** किंवा **MPW** द्वारे प्राथमिक आरोग्य केंद्राकडे पाठविल्यास (प्रती रक्तनमुना) | राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, सहसंचालक, आरोग्य सेवा, (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे – ६ यांचे जा.क्र. ससंआसे/किजरो/आशा वर्कर/मासू/नस्तीक्र. ४/१४५४४-९४/०१० दिनांक १५/०६/२०१० रोजीच्या पत्रान्वये, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरुन वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत मोबदला अदा करावा. | १) आशा स्वयंसेविकेने रुग्णाचा रक्तनमुना तपासणीसाठी **ANM** किंवा **MPW** कडे दिल्यानंतर प्रती रक्तनमुना रु.५ प्रमाणे अदा करावे.<br>२) दूषित रक्त नमुना आढळलेल्या PV किंवा PF रुग्णाचा समूळ उपचार केल्यास रक्तनमुन्याच्या रु.५ व्यतिरिक्त रु.५०/- मोबदला अदा करावा.<br>३) रॅपिड डायनोस्टिक टेस्ट किट द्वारे दूषित आढळून आलेल्या रुग्णांस समूळ औषधोपचार केल्यास रक्तनमुन्याच्या रु.५ व्यतिरिक्त रु.२०/- मोबदला अदा करावा. |
| | | राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, | रु. ५०/- | दूषित रक्त नमुना आढळलेल्या PV किंवा PF रुग्णाचा समूळ उपचार केल्यास (प्रती रुग्ण) | | |
| | | राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, | रु. २०/- | रॅपिड डायनोस्टिक टेस्ट किट द्वारे दूषित आढळून आलेल्या रुग्णांस समूळ औषधोपचार केल्यास (प्रती रुग्ण) | | |
| ५ | हिवतापाचा समुळ उपचार | राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, | रु.५०/- | गुंतागुंतीचा हिवतापाचे रुग्णास वैद्यकीय महाविद्यालयात/जिल्हा रुग्णालय/ उपजिल्हा रुग्णालय/ ग्रामीण रुग्णालय/ प्रा. आ. केंद्रात संदर्भित करुन भरती केल्यास (प्रति रुग्ण) | राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, सहसंचालक, आरोग्य सेवा, (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे – ६ यांचे जा.क्र. ससंआसे/किजरो/आशा वर्कर/मासू/नस्तीक्र. ४/१४५४४-९४/०१० दिनांक १५/०६/२०१० रोजीच्या पत्रान्वये, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरुन वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत मोबदला अदा करावा. | ४) गुंतागुंतीचा हिवतापाचे रुग्णास वैद्यकीय महाविद्यालयात/जिल्हा रुग्णालय/ उपजिल्हा रुग्णालय/ ग्रामीण रुग्णालय/ प्रा. आ. केंद्रात संदर्भित करुन भरती केल्यास रु. ५०/- प्रति रुग्ण |

| क्र | आशा स्वयंसेविका योजनेचा सन २०१० – ११ या आर्थिक वर्षाचा मंजूर PIP | निधीची तरतूद | अदा करावयाचा मोबदला | मानधनाचे स्पष्टीकरण | आशा स्वयंसेविकेस मोबदला अदा करण्याची पध्दती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | गंभीर आजारास संदर्भ सेवा दिल्यास (हिवताप व डेंग्यु) | राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, | रु. ५०/– | हिवताप व डेंग्यु आजाराच्या रुग्णास सरकारी रुग्णालयात भरती केल्यास (प्रा.आ.केंद्र, ग्रा.रु, जिल्हा व उपजिल्हा रुग्णालय) | राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम, सहसंचालक, आरोग्य सेवा, (हिवताप, हत्तीरोग व जलजन्य रोग), पुणे – ६ यांचे जा.क्र. ससंआसे/किजरो/आशा वर्कर/मासू/नस्तीक्र. ४/१४५४४–९४/०१० दिनांक १५/०६/२०१० रोजीच्या पत्रान्वये, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरुन वैद्यकीय अधिकाऱ्यामार्फत मोबदला अदा करावा. | |
| ७ | कृष्ठरोग औषधौपचार | एन.एल.ई.पी. | रु. १००/– | नविन केस शोधुन आणल्यास | सहसंचालक (कुष्ठरोग आणि क्षयरोग) यांचे पत्र क्र. ससंआसे/कुष्ठ/आशा मानधन/२००००–२०११२/१० दिनांक १९.०७.२०१० रोजीच्या पत्रान्वये, तालुका आरोग्य अधिकाऱ्याकडील निधी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी यांनी प्राप्त करुन आशा स्वयंसेविकेस मोबदला अदा करण्यात येईल. | आशा स्वयंसेविकेने प्राथमिक आरोग्य केंद्रास कुष्ठरोगाचा संशयित रुग्ण पाठविल्यास संशयित रुग्णास कुष्ठरोग आहे हे निदान झाल्यास आशा स्वयंसेविकेस नविन केस शोधुन आणल्याचा रु.१००/– मोबदला अदा करावा. |
| | | एन.एल.ई.पी. | रु. ४००/– | सांसर्गिक रुग्ण औषधोपचार पूर्ण केल्यास | | |
| | | एन.एल.ई.पी. | रु. २००/– | असांसर्गिक रुग्णाचे औषधोपचार पूर्ण केल्यास | | |
| ८ | साथरोग नियंत्रण | एकात्मिक रोग सर्वेक्षण प्रकल्प | रु.१००/– | साथीची प्रथम सुचना गावातून प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर वैद्यकिय अधिकारी यांना दिल्यास | सहसंचालक,(हिवताप हत्तीरोग व जलजन्यरोग ) यांचेकडून दिनांक ६ ऑक्टोंबर २०१० रोजी जा.क्र. एरोसप्र/आशामानधन / ४८०/२०१०–११ अन्वये निर्गमित पत्र. | |
| | | मिशन फलेक्सीपुल | रु.२५/– | गंभीर जलशुष्कता असलेल्या बाळास (प्रा.आ.केंद्र, ग्रा.रु, जि.रु.) येथे संदर्भ सेवा दिल्यास | मिशन फलेक्सीपुल मधून प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरुन मोबदला अदा करण्यात येईल. | |
| ९ | गरोदर मातांची एचआयव्ही तपासणी | मिशन फलेक्सीपुल | रु.१०/– | गरोदर महिलेस पीपीटीसीटी केंद्रात जाऊन एच.आय.व्ही टेस्ट करण्यास प्रवृत्त केल्यास | मिशन फलेक्सीपुल मधून प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरुन मोबदला अदा करण्यात येईल. | |

| क्र | आशा स्वयंसेविका योजनेचा सन २०१० - ११ या आर्थिक वर्षाचा मंजूर PIP | निधीची तरतूद | अदा करावयाचा मोबदला | मानधनाचे स्पष्टीकरण | आशा स्वयंसेविकेस मोबदला अदा करण्याची पध्दती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | एचआयव्हीबाधित मातेची प्रसुती | मिशन फलेक्सीपुल | रु. ५००/- | एचआयव्हीबाधित मातेस पीपीटीसीटी केंद्रात प्रसूतीसाठी दाखल केल्यास | मिशन फलेक्सीपुल मधून प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरुन मोबदला अदा करण्यात येईल. | |
| ११ | प्रसुतीनंतर एचआयव्हीबाधित मातेची १,६, व १८ महिन्यात तपासणी | मिशन फलेक्सीपुल | रु. ३००/- | एचआयव्हीबाधित मातेस पीपीटीसीटी केंद्रात १,६, व १८ महिन्यात तपासणी प्रवृत्त केल्यास (प्रती तपासणी रु. ३००/- मोबदला अदा करण्यात यावा.) | मिशन फलेक्सीपुल मधून प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावरुन मोबदला अदा करण्यात येईल. | आशा स्वयंसेविकेने एचआयव्हीबाधित मातेला प्रसुतीनंतर पहिल्या, सहाव्या व अठराव्या महिन्यात तपासणी करण्याकरिता प्रवृत्त करावयाचे आहे. प्रत्येक तपासणीमागे आशा स्वयंसेविकेस रु. ३००/- मोबदला अदा करावयाचा आहे. सदर मोबदला आशा स्वयंसेविकेस प्रती तपासणी नंतर अदा करण्यात यावा. |
| १२ | ग्रामपातळीवरील दरमहा लसीकरण | नियमित लसीकरण | रु.१५०/- | ग्रामपातळीवर बाहय संपर्क लसीकरणासाठी आशा स्वयंसेविका व अंगणवाडी सेविका यांच्या संयुक्त आधार गटास प्रोसाहानात्मक रक्कम. | ग्रामपातळीवर आशा स्वयंसेविका व अंगणवाडी सेविका यांचा संयुक्त आधार गट स्थापन करावा. लसीकरण सत्रापूर्वी पात्र लाभार्थीची यादी संयुक्त आधार गटास देण्याची जबाबदारी संबंधित आरोग्य सेविकेवर (ANM) राहील. लसीकरण सत्रासाठी देय असणारे रु.१५०/- समप्रमाणात आशा स्वयंसेविका व अंगणवाडी सेविका यांच्यामध्ये विभागून द्यावे. एखाद्या सत्रास दोन पैकी एक सदस्य उपस्थित नसल्यास उपस्थित असणाऱ्या सदस्यास पूर्ण रक्कम रु.१५०/- अदा करावी | अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण यांचे जा.क्र. राकुकका/नि.ल.नियोजन/कक्ष -९२ अ/नस्ती क्र. ९२४७२-७००/२०१० दिनांक ३० जून २०१० रोजीचे निर्गमित पत्र. |
| १३ | शौचालय बांधकाम | व्ही.एच.एन.एस.सी. | रु. ७५/- | गावामध्ये शौचालय बांधकामास प्रवृत्त केल्यास प्रती शौचालय | ग्राम आरोग्य,पोषण, स्वच्छता व पाणी पुरवठा समितीने ग्रामपंचायतीच्या प्रमाणपत्राच्या आधारावर मोबदला अदा करण्यात येईल. | |

| क्र | आशा स्वयंसेविका योजनेचा सन २०१० - ११ या आर्थिक वर्षाचा मंजूर PIP | निधीची तरतूद | अदा करावयाचा मोबदला | मानधनाचे स्पष्टीकरण | आशा स्वयंसेविकेस मोबदला अदा करण्याची पध्दती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १४ | जन्म नोंदणी | मिशन फलेक्सीपुल | रु. १०/- | ग्रामपातळीवर होणाऱ्या जन्माची नोंदणी उपकेंद्र/प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर केल्यास | मिशन फलेक्सी पुल मधून प्रती जन्म नोंदणी साठी मोबदला अदा करण्यात येईल. | वैद्यकीय अधिकारी (प्राथमिक आरोग्य केंद्र) यांनी मासिक सभेत मिशन फलेक्सीपुल मधून मोबदला अदा करण्यात करावा. |
| १५ | माता मृत्यूची नोदणी | मिशन फलेक्सीपुल | रु. ५००/- | ग्रामस्तरावर होणाऱ्या माता मृत्यूची नोंदणी उपकेंद्र/प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर केल्यास | मिशन फलेक्सी पुल मधून प्रती माता मृत्यू नोंदणीसाठी मोबदला अदा करण्यात येईल. | वैद्यकीय अधिकारी (प्राथमिक आरोग्य केंद्र) यांनी मासिक सभेत मिशन फलेक्सीपुल मधून मोबदला अदा करण्यात करावा. |
| १६ | नवजात मृत्यूची नोदणी | मिशन फलेक्सीपुल | रु. ५०/- | ग्रामस्तरावर होणाऱ्या नवजात मृत्यूची (२८ दिवसाच्या आतचे बाळ) नोंदणी उपकेंद्र/प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर केल्यास | मिशन फलेक्सी पुल मधून प्रती नवजात मृत्यू नोंदणीसाठी मोबदला अदा करण्यात येईल. | वैद्यकीय अधिकारी (प्राथमिक आरोग्य केंद्र) यांनी मासिक सभेत मिशन फलेक्सीपुल मधून मोबदला अदा करण्यात करावा. |
| १७ | लसीकरण | आशा स्वयंसेविका योजनेच्या मंजूर PIP मध्ये मंजूरी मिळालेली आहे. सदर मोबदला VHNSC मधून अदाकरण्यात यावा. | रु. ७५०/- | ग्रामस्तरावर १०० टक्के बालकाचे वार्षीक लसीकरण पुर्ण केल्यास | गावात १०० टक्के लसीकरण झाल्याचे प्रमाणपत्र ANM ने आशा स्वयंसेविकेस द्यावे. सदर प्रमाणपत्र VHNSC च्या सचिवाकडे सादर केल्यानंतर VHNSC च्या रु. १०,०००/- च्या निधीमधून मोबदला अदा करण्यात येईल. | सदर मोबदला VHNSC मधून अदा करण्यात यावा. |

| क्र | आशा स्वयंसेविका योजनेचा सन २०१० – ११ या आर्थिक वर्षाचा मंजूर PIP | निधीची तरतूद | अदा करावयाचा मोबदला | मानधनाचे स्पष्टीकरण | आशा स्वयंसेविकेस मोबदला अदा करण्याची पध्दती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आशा स्वयंसेविका योजनेच्या मंजूर PIP मध्ये मंजूरी मिळालेली आहे. सदर मोबदला VHNSC मधून अदा करण्यात यावा. | रु.५००/- | ग्रामस्तरावर ९० टक्के बालकाचे वार्षीक लसीकरण पुर्ण केल्यास | गावात ९० टक्के लसीकरण झाल्याचे प्रमाणपत्र ANM ने आशा स्वयंसेविकेस द्यावे. सदर प्रमाणपत्र VHNSC च्या सचिवाकडे सादर केल्यानंतर VHNSC च्या रु. १०,०००/- च्या निधीमधून मोबदला अदा करण्यात येईल. | सदर मोबदला VHNSC मधून अदा करण्यात यावा. |
| १८ | ग्राम आरोग्य व पोषाहार दिन व लसीकरण सत्र आयोजित करणे | आशा स्वयंसेविका योजनेच्या मंजूर PIP मध्ये मंजूरी मिळालेली आहे. सदर मोबदला VHNSC मधून अदाकरण्यात यावा. | रु. १५०/- प्रती ग्राम आरोग्य व पोषाहार दिन दरमहा साजना केल्यास. | आरोग्य व पोषण दिन साजरा केल्यास | दरमहा ग्रामपातळीवर आरोग्य व पोषण दिन साजरा करण्यास पुढाकार घेतल्यास प्रती आशा स्वयंसेविका रु. १५०/- VHNSC च्या रु. १०,०००/- च्या निधीमधून मोबदला अदा करण्यात येईल. | सदर मोबदला VHNSC मधून अदा करण्यात यावा. |
| १९ | गंभीर बालकास संदर्भ सेवा (आदिवासी भागात) | आशा स्वयंसेविका योजनेच्या मंजूर PIP मध्ये मंजूरी मिळालेली आहे. सदर मोबदला VHNSC मधून | रु. ५०/- | गंभीर बालकास संदर्भ सेवा (आदिवासी भागात) दिल्यास | आशा स्वयंसेविकेने गंभीर आजाराच्या बालकास संदर्भ सेवा दिल्यास संबंधित ANM यांनी प्रमाणित करावे. सदरच्या प्रमाणपत्राच्या आधारावर VHNSC मधून मोबदला अदा करण्यात यावा.<br><br>सदर गंभीर आजारामध्ये हिवताप व डेंग्यू हे आजार समाविष्ट नाही. हिवताप व डेंग्यू या आजाराच्या संदर्भ | |

| क्र | आशा स्वयंसेविका योजनेचा सन २०१० – ११ या आर्थिक वर्षाचा मंजूर PIP | निधीची तरतूद | अदा करावयाचा मोबदला | मानधनाचे स्पष्टीकरण | आशा स्वयंसेविकेस मोबदला अदा करण्याची पध्दती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अदाकरण्यात यावा. | | | सेवेसाठी क्र. ६ च्या सूचनेनुसार देण्याची कार्यवाही करावी. | |

# गटप्रतर्वक (Block Facilitator)

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानातील आशा कार्यक्रमांतर्गत गावपातळीवर १००० लोकसंख्येस एक आशा स्वंयसेविका याप्रमाणे संपूर्ण जिल्हयामध्ये आशा स्वंयसेविका यांच्या नियुक्त्या स्थानिक ग्राम सभेच्या माध्यमातून करण्यात आलेल्या आहेत. सदर आशा स्वंयसेविका यांच्यावर पर्यवेक्षन करणेकरीता प्रति प्रा आ केंद्र एक याप्रमाणे गटप्रवर्तक यांच्या नियुक्त्या करण्यात आलेल्या आहेत.

**गट प्रवर्तकाच्या निवडीसाठी खालीलप्रमाणे निकष रहातील.**

१) अर्जदार महिला असावी.
२) अर्जदार महिला सबंधीत प्रा आ केंद्राच्या कार्यक्षेत्रातील असावी.
३) वयोमर्यादा २१ (पूर्ण) ते ४० वर्ष असावी.
४) शैक्षणिक पात्रता १२ वी सायन्स पास असावी. विज्ञान शाखेतील उच्च शैक्षणिक पात्रता धारकांना प्राधान्य राहील.

**गट प्रवर्तकाच्या भूमिका व जबाबदा-या**

१) गट प्रवर्तक यांनी आशा स्वयंसेविका व आरोग्य विभाग यांच्यात समन्वय साधणे
२) आशा स्वयंसेविकांना येणा-या अडचणी समजून घेणे त्यांना त्यांच्या जबाबदारीची जाणिव करुन देणे.
३) आशा स्वयंसेविकांना कामाचा मोबदला वेळेवर मिळावा म्हणून पाठपूरावा करणे
४) आशा स्वयंसेविकाला देण्यात येणा-या प्रशिक्षणांची उजळणी गाव भेटी दरम्यान घेणे.
५) प्रत्येक आशा स्वंयेसेविकेला गट प्रवर्तक महिलेने महिन्यातून दोन भेटी देणे .
६) आशा स्वयसेविकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्र व तालुका सभेस उपस्थित रहाणे व मार्गदर्शन करणे.
७) आशा स्वंयसेविकेचा गावपातळीवर समन्वय साधणेसाठी सरपंच, उपसरपंच, पोलिस पाटील, गाव तंटा मुक्तीचे अध्यक्ष, सनियंत्रण समितीचे अध्यक्ष यांना भेटून आशा स्वंयसेविकेच्या भूमिकेविषयी माहिती देणे.
८) गट प्रवर्तक महिलेस महिन्यातून २० दिवस ग्राम स्तरावर भेटणे बंधनकारक राहील. प्रत्येक दिवसाच्या गाव भेटीसाठी रु १५०/- प्रमाणे प्रवास खर्च व भत्त्यासह कमाल रु ३०००/- अनुज्ञेय राहील. याशिवाय कामासाठी कोणतीही रक्कम देय रहाणार नाही.

**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद सातारा**